REGISTERED No. B. 3434




# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १४ पुणें, बुधवार तारीख ८ सप्टेंबर, १९४८ अंक ३६


## दि सांगली स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

**( स्थापना सन १९२७ )**


| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ५,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | १,६२,००० रु. |
| भरलेलें भांडवल | ९३,११० रु. चे वर |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,०९,८४० रु. चे वर |
| खेळतें भांडवल | ११,००,००० रु. चे वर |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासदांना, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागिदारांना योग्य तारणावर कर्जें दिलीं जातात. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा व इंडिया इक्विटेबल इं. कं. लि. कलकत्ता, या कंपन्यांचे विम्यांचे हप्ते स्वीकारले जातात. चेक–हुंड्यांची खरेदीविक्री, सरकारी कर्जरोखे व शेअर्स यांची खरेदीविक्री व व्याज वसुली वगैरे

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार**
**या बँकेमार्फत केले जातात.**

बँकेनें नवीन शेअर्स विक्रीस काढले असून शेअर विक्री चालू आहे. प्रत्येक शेअर रु. ५०/– चा असून अर्जासोबत दर शेअरमागे रु. २५/– ( रु. ५/– प्रिमीयम् म्हणून व रु. २०/– अर्जासोबतचे ) रक्कम भरणेची आहे. उरलेली रु. ३०/– ची रक्कम जरूर लागेल त्यावेळीं रु. १०/– चा एक या प्रमाणें ३ हप्त्यांनीं वसूल करणेंत येईल. दोन हप्त्यांमधील अंतर ३ महिन्यांचेपेक्षां कमी असणार नाहीं. शेअर अर्ज व इतर माहिती पाहिजे असल्यास बँकेचें ऑफिसमध्यें मिळेल.

**ना. पां. ठाणेदार**
मॅनेजर


**अधिक धान्य पिकविण्याची योजना**

—यशस्वी होण्यास—

## किर्लोस्कर पंपिंग सेट्स

**हें अमोघ साधन आहे.**

त्याचें सहाय घ्या !

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी



तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें







# मशिनरी खरेदीचा प्रश्न

कोणतीहि मशिनरी खरेदीपूर्वी आमचा सल्ला घ्या. आमचें सहकार्य आपल्या नेहमींच फायद्याचें ठरेल.

लेथ्स, ड्रिलिंग मशिन्ज, ऑईल एंजिन्स, वगैरेचे विक्रेते.

केळकर बंधू, बुधवार चौक. पुणें २.


## विविध माहिती

**हिंदुस्थानसाठी कॉस्टिक सोडा**—जुलै ते सप्टेंबर, १९४८ ह्या तीन महिन्यांसाठी अमेरिकेच्या व्यापार खात्यानें हिंदुस्थानला १ कोटी, ४० लाख पौंड कॉस्टिक सोडा देण्याची मंजुरी दिली आहे. ह्या तिमाहींत अमेरिकेंतून एकूण निर्यात होणाऱ्या सोड्याशीं वरील सोड्याचें प्रमाण १० टक्के पडतें. ह्या वर्षीच्या पहिल्या सहा महिन्यांत हिंदुस्थानला २ कोटी, ५० लाख पौंड कॉस्टिक सोडा मिळाला आहे.

**पाकिस्तानांत धान्याचा तुटवडा**—सिंधमधील व पश्चिम पंजाबांतील पुरामुळें पाकिस्तानांत धान्याची टंचाई उत्पन्न झाली आहे. त्यामुळें पाकिस्तान हिंदुस्थानला ठरल्याप्रमाणें अन्नधान्य पाठवूं शकणार नाहीं. पश्चिम पंजाब सरकारनें पाकिस्तान सरकारला असें कळविलें आहे कीं, आश्वासन दिल्याप्रमाणें ५० हजार टन गहूं पाकिस्तान सरकारकडे पाठवितां येणार नाहीं. सिंधनेंही २८ हजार टन तांदूळ देण्यास आपण असमर्थ आहों, असें कळविलें आहे.

**दारूबंदीमुळें झालेली बचत**—संयुक्त प्रांताच्या अबकारी खात्याच्या मंत्र्यांनीं नुकतेंच असें सांगितलें कीं, प्रांताच्या कॉंग्रेस मंत्रिमंडळानें दारूबंदीचें जें धोरण स्वीकारलें त्यामुळें लोकांचे दारूवर खर्च होणारे जवळ जवळ तीन कोट रुपये वांचले. कानपूरमधील कामगार वर्गावर सरकारच्या दारूबंदीचा झालेला चांगला परिणाम स्पष्टपणें दिसून येत आहे, असेंहि ते म्हणाले.

**हिंदुस्थान अमेरिकेकडून कर्ज घेणार?**—हिंदचे अमेरिकेंतील वकील सर बी. रामराव ह्यांनीं नुकतीच अमेरिकन अंडर सेक्रेटरी ऑफ स्टेट ह्यांची भेट घेतली. भेटीनंतर बोलतांना ते म्हणाले कीं, अमेरिकेच्या एक्सपोर्ट-इम्पोर्ट बँकेकडून हिंदुस्थानला कर्ज मिळणें शक्य असेल तर बरें होईल. हिंदुस्थान सरकार ह्या बँकेकडून कर्ज मिळविण्याच्या विचारांत असल्याचा तर्क ह्या वृत्तावरून केला जात आहे.

**मच्छीमारीचा धंदा**—हिंदुस्थानांतील मच्छीमारीच्या धंद्यांत दरवर्षी सुमारें १ कोटी, ८० लाख मण मासे पकडले जातात. म्हणजे, दरमाणशीं दर दिवशीं ०.२ औंस इतकेंच प्रमाण पडतें. मध्यवर्ती सरकार, प्रांतांतून ह्या धंद्याची वाढ करण्यासाठी आर्थिक मदत देत आहे. तळ्यांतून लवकर वाढणाऱ्या माशांच्या जाती मुद्दाम पुरविण्यांत येत आहेत. मुंबई आणि मद्रास येथें खोल पाण्यांतील मच्छीमारीचा धंदा चालविण्यांत येत आहे.

**यांत्रिक नांगराची शेती**—मध्यवर्ती सरकारच्या अन्नखात्याचे एकूण ६०० यांत्रिक नांगर आहेत. सरकारच्या अधिक धान्य पिकविण्याच्या योजनेंतील एक भाग म्हणून प्रांतिक सरकारांना हे नांगर भाड्यानें देण्यांत येतात. झाडझुडपें काढून नवीन जमीन शेतीला लायक करण्यासाठी अगर पडीक जमीन नांगरण्यासाठी दर एकरी साडेआठ रुपये भाडें घेतलें जातें. नांगर पुरवणारी संघटना नांगर चालविण्यासाठी दोन शिक्षित ड्रायव्हर्सही देते. सध्या मुंबई प्रांतांत ८२ नांगर काम करीत आहेत. संयुक्तप्रांतांत ७९, मध्यप्रांतांत २१ आणि पश्चिम बंगालमध्यें १८ असे नांगर काम करीत आहेत.

**बँकांतील चोऱ्यांबाबत धोक्याची सूचना**—मुंबईमधील बँका व पोस्ट ऑफिसें ह्यांत वाढत्या प्रमाणावर होणाऱ्या चोऱ्यांकडे नागरिकांचें लक्ष तीव्रतेनें वेधण्यासाठी मुंबई सरकारनें एक हजार सचित्र फलक ठिकठिकाणीं लावण्याचें ठरविलें आहे. पहिल्या फलकावर इंग्रजी, हिंदी व गुजराती भाषांतून धोक्याची सूचना देण्यांत आली आहे. बँकांशीं व्यवहार करणाऱ्या पैसेवाल्या गिऱ्हाइकांत महाराष्ट्रीयांचें प्रमाण अत्यल्प आहे, हा त्याचा सरळ अर्थ आहे.

**पेट्रोलचा शोध**—बर्मा ऑइल कंपनी (पाकिस्तान कन्सेशन्स) ही कंपनी सिंधमध्यें लखरी येथें पेट्रोलच्या शोधासाठी विहीर खणीत आहे. आतांपर्यंत १,९२६ फूट खोल बोअरिंग पुरें झालें आहे. ह्यापुढील बोअरिंगची नळी १३३ इंची राहील. १०,००० फूट खालीं गेल्यावर तेल सापडेल किंवा नाहीं ह्याचा अंदाज करतां येईल.

**अर्जेंटायना हिंदुस्थान करार**—अर्जेंटायना आणि हिंदुस्थान ह्यांच्या दरम्यान वकिलातीचे संबंध प्रस्थापित करण्याचें घाटत आहे. अर्जेंटायनाशीं एक व्यापारी करारहि करण्यांत येणार असून त्याअन्वयें ताग देऊन ह्याच्या बदला गहूं घेण्याचें ठरणार आहे.

**नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकेटस**—हिशेबी वर्षाच्या पहिल्या अकरा महिन्यांत हिंदुस्थानांतील सामान्य नागरिकांनीं १८ कोटी रुपयांचीं नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकेट्स विकत घेतलीं. राष्ट्रीय पुनर्घटनेच्या योजनेंत ह्या सर्टिफिकेटच्या योजनेला बरेंच महत्त्व आहे. सर्टिफिकेटसच्या खरेदींत मुंबई प्रांताचा नंबर पहिला लागतो व संयुक्त-प्रांताचा तिसरा लागतो. खेड्यांतून मात्र ही योजना यशस्वी झाली नाहीं. लोकांना पैसे शिल्लक टाकण्याला उत्तेजन यावें म्हणून सरकारनें ५ वर्षे व ७ वर्षे मुदतीचीं अशीं आणखी दोन प्रकारचीं सेव्हिंग्ज सर्टिफिकेटस काढलीं आहेत.

**हप्तेबंदीच्या खरेदीवर नियंत्रण**—२० सप्टेंबर, १९४८ पासून ५० ते ५,००० डॉलर्सपर्यंतच्या हप्तेबंदीच्या खरेदीच्या व्यवहारावर अमेरिकन सरकारनें नियंत्रण घातलें आहे. ह्या नियंत्रणाअन्वयें मोटारीच्या एकूण किंमतीचा पहिला हप्ता एक तृतीयांश ठेवलेला असून तो खरेदीदारानें रोख द्यावयाचा आहे. घरांत लागणारीं भांडींकुंडीं, स्टोव्ह, धुण्याचीं यंत्रें, रेफ्रिजरेटर, रेडिओ, इत्यादि वस्तूंच्या किंमतीपैकी २० टक्के किंमत रोख द्यावयाची आहे. जी खरेदी १,००० डॉलर्सच्या आंत असेल ती १५ हप्त्यांत पूर्ण केली पाहिजे व त्या रकमेच्या वरील खरेदी १८ हप्त्यांत पूर्ण केली पाहिजे, अशीं बंधनें घालण्यांत आलीं आहेत.


-सर्व प्रांतांतील-
सुती - गरम - रेशमी
—खादीचें माहेरघर—

# खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ, डमढेरे बोळाजवळ, पुणें २

# अर्थ

बुधवार, ता. ८ सप्टेंबर १९४८



संस्थापक

प्रो. वा. गो. काळे

संपादक :

श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## ऐकावें जनांचें —

( प्रा. द. गो. कर्वे )

दुसऱ्या जागतिक युद्धाचा ऐन भर असतांनाही जेवढ्या किंमती वाढल्या नाहींत तेवढ्या आज वाढल्या आहेत. उलट पक्षीं, लोखंड, कापड, कोळसा, शिमीट, अन्नधान्य इत्यादि आवश्यक वस्तूंची निपज घटत आहे. वाढत्या राहणीच्या खर्चामुळें मजूरी व पगार ह्यांमध्यें एकसारखी वाढ होऊनही वेतनदार वर्गाला दरमहिन्याला कांहींना कांहीं तरी आवश्यक वस्तूला मुकावें लागत आहे. पाकिस्तानांतून उठवून लावलेल्या हिंदू व शीख जनतेची गुजराण करून, त्यांची नित्याच्या धंद्यांत पुनर्स्थापना करण्याकरतां सरकारला फार मोठा खर्च करावा लागत आहे. काश्मीर व हैद्राबाद ह्या आघाड्या सांभाळण्यास आणि राष्ट्रीय संरक्षणास आवश्यक अशी लष्करी आणि आरमारी साधनें उभारण्यास खर्च करावा तेवढा पैसा कमीच आहे. ह्याच वेळीं दामोदर खोऱ्यांतील आणि पूर्व पंजाबांतील मोठमोठीं धरणें, विजेची उत्पादन केंद्रें, कालवे वगैरे परिणामी उपयुक्त परंतु मनस्वी खर्चाच्या योजना चालू करण्यांत आल्या आहेत. एकंदर सरकारी खर्च करांच्या अगर कर्जाच्या जमेपेक्षां वाढाव्याचा होत असून नवें चलन काढून तो भागवावा लागत आहे. राष्ट्राचा संसार गैरहिशेबी होण्याची वेळ आली आहे, व त्यामुळें सरकार, धंदेवाले, कामगार आणि सामान्य जनता ह्या सर्वांचीच मनें अस्वस्थ झालेलीं आहेत.

विस्कळीत आणि गैरहिशेबी आर्थिक क्रमास वेळेवर आळा न घातला तर कोणत्या थराला गोष्टी जातात ह्याचें प्रात्यक्षिक चीनच्या अनुभवावरून सर्वांच्या पुढें आहेच. त्यामुळें सर्व आर्थिक परिस्थितीचा आढावा घेऊन राष्ट्राचें स्थैर्य आणि अभ्युदय ह्यांना पोषक असा आर्थिक कार्यक्रम आखण्याकरितां गेल्या महिनाभर हिंदुस्थान सरकार कामगार चळवळीचे पुढारी, अर्थशास्त्री, उद्योगपती आणि इतर सरकारी आणि बिन-सरकारी तज्ज्ञ ह्यांच्याशीं सल्लामसलत करीत आहे. निरनिराळ्या गटांकडून आणि व्यक्तींकडून सरकारला जो सल्ला मिळाला त्याचा गोषवारा आतां अधिकृतरीत्या प्रसिद्ध झाला आहे. आप्तजनांचा सल्ला ऐकून सरकार आतां स्वतःचें धोरण कोणतें ठरवितें इकडे सर्व जनता डोळे लावून बसली आहे.

लोकांच्या खाजगी गरजा व सरकारच्या बहुविध जबाबदाऱ्या ह्यांस पुरण्याइतका माल उपलब्ध नाहीं ही मुख्य अडचण आहे. सुदैवानें आपल्या पौंडी शिलकींतून परराष्ट्रीय आयात करून यंत्रसामुग्री, कच्चा माल, तेल, कापड व कागद ह्यांसारख्या आवश्यक वस्तूंचा पुरवठा वाढविणें शक्य आहे. आयात व्यापारावर सध्यां सरकारचीं नियंत्रणें आहेत तीं ढिली करून आणि अनेक लहानमोठ्या परराष्ट्रांत आपलीं खरेदी मंडळें पाठवून ही उणीव भरून काढणें आवश्यक आहे, असा सल्ला सर्व गटांनीं दिलेला आहे. उद्योगपतींचें म्हणणें असें कीं सरकार एकसारख्या आर्थिक धोरणाच्या, क्वचित् प्रसंगीं परस्पर-विरोधी आणि भेडसावणाऱ्या, घोषणा करीत असते त्यामुळें धंदेवाल्यांस मालाचें उत्पादन वाढविण्यास उत्तेजन न मिळतां उलट हळूहळू आपला व्याप कमी कसा करावा हीच चिंता त्यांस लागून राहिली आहे. जर कांहीं काळ तरी खाजगी धंदेवाल्यांमार्फतच औद्योगिक वाढीस हातभार लागणें आवश्यक आहे, तर त्यांची नाउमेद होण्यासारख्या घोषणा करण्यांत राष्ट्राचा फायदा कांहींच नाहीं. जरूर त्या वेळीं कोणतेंही आवश्यक धोरण स्वीकारण्यास कोणतेंही सरकार समर्थ आहे. नवी यंत्रसामुग्री मिळविण्याच्या अडचणी ध्यानांत घेतां, आहेत त्या साधनांचाच अधिकांत अधिक उपयोग होण्याकरितां शक्य तेथें दुसरी अगर तिसरी पाळी करण्यास कामगारांनीं तयार व्हावें असेंही कारखानदारांनीं सुचविलें आहे. चालू स्थिति अत्यंत आणीबाणीची आहे व तिच्यांतून पार पडण्यास सर्व वर्गांवर सारखा भार टाकण्याचें धोरण सरकारनें अवलंबिलें आहे, ह्या गोष्टी कामकरी वर्गास पटल्या, तर ह्या बाबतींत त्यांचा विरोध टिकेल असें वाटत नाहीं. अर्थशास्त्रज्ञांच्या सूचनेप्रमाणें प्रत्येक धंद्याकरतां मजूर, मालक व तज्ज्ञ ह्यांची कार्यकारिणी समिति नेमून एकविचारानें उत्पादनाचा कार्यक्रम आखल्यास क्रमाक्रमानें आवश्यक वस्तूंचा पुरवठा वाढत जाईल.

परकी आणि स्वदेशी मालाचा साठा वाढत्या प्रमाणांत उपलब्ध होण्यापूर्वी चलनी नोटांचा पुरवठा वाढत राहिला तर पुन्हां किंमती, राहणीचा खर्च आणि मजूरी ह्यांत वाढ होत राहून आर्थिक परिस्थितीची अस्थिरताही तीव्र होईल. असें न व्हावें आणि पुरवठ्याचा कार्यक्रम व्यवस्थितपणें पार पडावा म्हणून सरकारनें नव्या नोटा काढण्याचें तात्काळ बंद करावें, असाही सर्व सल्लागार गटांचा आदेश आहे. हा सल्ला मान्य करण्याचा एकच मार्ग आहे. चालू खर्चास लागणारा सर्व पैसा करांच्या रूपानें उभारणें व नैमित्तिक खर्चास लागणारा पैसा कर्जाच्या रूपानें उभारणें हाच तो मार्ग होय. एका बाजूनें खर्च शक्य तितका कमी करून, उलट बाजूनें करांची वाढ करून आणि जरूर तेवढें कर्ज उभारलें जाण्याच्या योजना आखून हें ध्येय गांठलें पाहिजे. विधायक आणि समाजसंवर्धक योजनांवर अमर्यादित खर्च करणें हें आजच्या अशांततेच्या आणि सार्वत्रिक दुष्काळाच्या काळांत शक्य अगर इष्ट नाहीं, हें प्रथम स्पष्ट केलें पाहिजे.

करवाढ करावी ह्याचा अर्थ वाटेल तो कर लादावा अगर वाढवावा असा नाहीं. उदाहरणार्थ, बहुतेक सल्लागारांनीं सरकारनें दारुबंदीचें धोरण स्थगित करावें असें सुचविलें आहे, तें आम्हांस योग्य अगर आवश्यक वाटत नाहीं.

मुळांत मद्यपानबंदी हें ध्येय योग्य आहे कां नाहीं, हा प्रश्न निराळा. एकदां हें धोरण जाहीर केल्यावर आणि त्या दृष्टीनें निम्मा अधिक पल्ला गांठल्यावर आतां तें कांहीं कारणानें पुन्हां अर्धवट सोडल्यास, तें पुन्हां केव्हांही यशस्वी करण्याच्या मार्गांतील अडचणी द्विगुणित होणार आहेत. शिवाय, आज आर्थिक धोरणाच्या दृष्टीनें आवश्यक अशी गोष्ट म्हणजे अमुक एक कर चालू ठेवावा ही नसून, आवश्यक आणि उपलब्ध अशा वस्तू-



हद खेरीज इतर गोष्टी खरेदी करण्यास लोकांजवळ पैसा शिल्लक राहू

नये, तो करानें अगर कर्जानें सरकारी तिजोरींत खेचला जावा, ही गोष्ट जरूर आहे. अबकारीऐवजीं इतर प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कर लादून आणि कर्ज उभारण्याची कांहीं खुबीची आणि कांहीं कायदेशीर योजना करून जरूर तें 'द्रव्यशोषण' अधिक श्रेयस्कर मार्गानें करणें शक्य आहे.

कर्ज व भांडवल उभारण्यास मदत व्हावी म्हणून व्याजाचा दर वाढवावा अशी सूचना कांहीं लोक वारंवार करतात. सल्लागारांपैकीं फक्त पेढीवाल्यांनीं ही सूचना केली आहे. व्याजाचा दर हा देखील एक बाजारभाव आहे. तो वाढूं देणें इष्ट नाहीं आणि आतांपर्यंत गुंतविलेल्या सर्व पैशांची भांडवली किंमत अशा धोरणानें कमी होईल हें जाणून इतर कोणत्याही जाणत्या गटानें ह्या सूचनेला पाठिंबा दिलेला नाहीं. उलट, रिझर्व बँकेनें जरूर तेथें प्रत्यक्ष खाजगी कर्जांवर नियंत्रण घालावें असें सुचविलें आहे. दीर्घकालीन व्याजाचा दर न वाढवितां सहा महिने व एक वर्ष मुदतीच्या तिजोरी हुंड्यांवरील दर जरूर तर थोडा वाढवावा अशी अर्थशास्त्रज्ञांची सूचना आहे ती स्वागतार्ह आहे.

अपुरा पुरवठा आणि युद्धप्राय परिस्थिति ह्या दोन्ही आपत्तींत सामान्य माणूस चिरडला जाऊं नये, हें न्याय्य उद्दिष्ट गांठावयाचें तर पुन्हां कांहीं काळ आवश्यक उपयोगाच्या आणि कारखानदारी वस्तूंवर निपज, पुरवठा, विक्री आणि किंमती ह्यांबाबतींत नियंत्रण घालणें आवश्यक आणि अपरिहार्य आहे. ह्या बाबतींत सर्व सल्लागारांचें एकमत आहे. पूर्वानुभवावरून आतां नियंत्रणाचें क्षेत्र, संघटना आणि तंत्र ह्या बाबतींत शक्य तितक्या सुधारणा होणें आवश्यक आहे. युद्ध संपल्यावर आणि विनियंत्रणाचा थोडा अनुभव आल्यावर आतां पुन्हां नियमांनीं व कार्ड-परवानग्यांनीं जखडलेलें जीवन कोणासही स्वागतार्ह वाटणार नाहीं. परंतु आज सर्व जगभर कमीअधिक प्रमाणांत हीं सर्व बंधनें अपरिहार्य म्हणून उत्साहानें नाहीं तरी देशनिष्ठेनें पाळलीं जात आहेत. हिंदुस्थानची स्थिति इतर श्रीमंत व बलिष्ठ राष्ट्रांहून अधिक बिकट आहे. संपूर्ण आर्थिक अरिष्ट टाळावयाचें असेल तर सर्व सल्लागार गटांच्या सूचनेनुसार सरकारनें निश्चित धोरण आंखलें पाहिजे, व त्याबद्दल लोकांस पूर्णपणें विश्वासांत घेतलें पाहिजे. राष्ट्रीय आपत्तींत लोकशाही सरकार जें धोरण ठरवील त्याला सर्व जनतेचा पूर्ण पाठिंबा मिळेल अशी आमची खात्री आहे.

# स्फुट विचार

### कॉमनवेल्थचा आगीच्या विम्याचे धंद्यांत पुढाकार

पुणें येथील कॉमनवेल्थ विमा कंपनी लि. नें स्वातंत्र्य दिनाचे सुमुहूर्तावर आगीच्या विम्याचें काम करण्यास प्रारंभ केला, ही गोष्ट महाराष्ट्राच्या आर्थिक व औद्योगिक प्रगतीची उत्कृष्ट द्योतक आहे. गेल्या दहा-पंधरा वर्षांत महाराष्ट्रांत अनेक बँका व विमा कंपन्या निघाल्या, त्याचप्रमाणें कित्येक नवे उद्योगधंदे व कारखाने स्थापन होऊन वाढीस लागले. त्या सर्वांस, कॉमनवेल्थ कंपनीच्या प्रारंभीच्या यशानें प्रोत्साहन मिळालें असें म्हटलें तर तें चुकीचें होणार नाहीं. मध्यंतरीं कांहीं काळ कॉमनवेल्थला मागें रहावें लागलें तरी तिनें कठीण कसोटीस उतरून पुनः नेतृत्व पतकरण्याइतकी प्रगति केली आहे. आगीच्या विम्याचा धंदा सुरू करण्याचा अग्र मान तिला मिळाला आहे. आगीचें काम करण्यासाठी आवश्यक ती आर्थिक पात्रता कॉमनवेल्थला भरपूर प्रमाणांत आहे, आणि हें काम करणारी कॉमनवेल्थ ही पहिलीच महाराष्ट्रीय कंपनी आहे. तिला महाराष्ट्राचा सक्रिय पाठिंबा मिळेल, अशी खात्री वाटते. कॉमनवेल्थला आगीच्या विम्याचें काम देऊन तिच्या कार्यक्षेत्राच्या वाढीस महाराष्ट्रीयांनीं जरूर हातभार लावावा. आगीच्या विम्याची जोखीम, विमा कंपनी इतर कंपन्यांत नेहमींच वाटून देत असल्याकारणानें, ह्या नव्या उपक्रमास हातभार लावल्यानें विमेदारांचें संरक्षण कमी होण्याचें कारण नाहीं, हें उघड आहे.

---

### रिझर्व्ह बँकेचें राष्ट्रीयीकरण

हिंद सरकारचे फडणीस, श्री. नियोगी, ह्यांनीं रिझर्व्ह बँकेचें राष्ट्रीयीकरण करणारें बिल पार्लमेंटपुढें मांडलें, तें मंजूर झालें आहे. १ जानेवारी, १९४९ पासून नवीन व्यवस्था अंमलांत आणण्याचा सरकाचा विचार आहे. हिंद सरकार आणि रिझर्व्ह बँक ह्यांचे संबंध आजपर्यंत फार निकटचे आणि विश्वासाचे रहात आलेले आहेत. ह्याच संबंधांना कायदेशीर स्वरूप देण्याचा बिलाचा उद्देश आहे. बिलावर भाषण करतांना फडणीस म्हणाले कीं, ज्या संस्थेवर देशाचें आर्थिक बरेंवाईट होणें बऱ्याच अंशीं अवलंबून आहे तिचें राष्ट्रीयीकरण प्रथम होणें योग्यच आहे. बँकेचें राष्ट्रीयीकरण होणार असलें तरी तिच्या व्यवस्थेचें स्वातंत्र्य पूर्वीप्रमाणेंच कायम राखण्यांत येणार आहे. बँकेचे व्यवहार धंदेवाईक पद्धतीनेंच शक्य तोंवर चालविण्यांत येणार आहेत. थोडक्यांत म्हणजे, बँकेच्या राष्ट्रीयीकरणामुळें तिच्या दैनंदिन व्यवस्थेंत जवळ जवळ कांहींच फरक होणार नाहीं. रिझर्व्ह बँक ही देशांतील चलनाची अधिकारी संस्था आहे. सरकारचे फडणिशी, आर्थिक आणि पैशाविषयींचें धोरण एकसूत्री राखण्याच्या दृष्टीनें रिझर्व्ह बँक व सरकार ह्यांचे संबंध कायद्यानें सुसूत्र करणें जरूर होतें. त्याच दृष्टीनें हें बिल पार्लमेंटपुढें मांडण्यांत आलेलें आहे. पूर्वीच्या फडणिसांनीं बँकेच्या भागीदारांना नुकसान भरपाई देण्याचें आश्वासन दिलें होतें, तें आश्वासन राष्ट्रीयीकरण करतांना कायम ठेवलेलें आहे.

---

### पुनर्घटनेचें स्वरूप

रिझर्व्ह बँकेच्या भागीदारांचे भाग सरकार सक्तीनें विकत घेणार, त्यांची किंमत प्रत्येक भागास ११८ रु. १० आ. अशी ठरविण्यांत आली आहे. ३% सरकारी रोख्यांच्या स्वरूपांत ही रक्कम दिली जाईल. परंतु हे रोखे १०० रु. च्या खालच्या दर्शनी किंमतीचे नसल्याकारणानें, एकूण देण्यापोटीं शक्य तेवढे रोखे देऊन उरलेली रकम चेकनें दिली जाईल. उदाहरणार्थ, ५ भाग धारण करणाऱ्या भागीदारास त्याच्या ५ भागांचे ५९३ रु. २ आ. मिळतील; त्यापैकीं ५०० रुपयांचे रोखे व ९३ रु. २ आ. चा चेक असेल. ज्या डायरेक्टरांनीं डायरेक्टराच्या जागेच्या लायकीसाठीं आवश्यक ते शेअर्स सरकारकडून विकत घेतले होते, त्यांना प्रत्येक भागाचे अर्थातच १०० रु. च मिळतील. ठराविक दिवशीं बँकेच्या मध्यवर्ती बोर्डाचे व स्थानिक बोर्डांचे डायरेक्टर जागा खाली करतील. गव्हर्नर व डेप्युटी गव्हर्नर हे मात्र रहातील आणि बोर्डाची पुनर्घटना होईपर्यंत बँकेचे सर्व अधिकार गाजवितील. नव्या मध्यवर्ती बोर्डाचे सर्व डायरेक्टर सरकारच नेमील. स्थानिक बोर्डांच्या सभासदांची संख्या ८ ची ३ केली आहे व हे तिघेही सरकारच नेमील. बँकेचें धोरण व कारभार ह्यासंबंधांत तिनें मध्यवर्ती सरकारचा सल्ला मानावयाचा आहे. अधिकारारूढ पक्षाचें त्यामुळें बँकेवर प्रभुत्व रहाणार आहे.

---

पुस्तक-परिचय

## सोव्हिएट रशिआचा सर्वांगीण सर्वोदय

[ खंड पहिला ]

( लेखक: श्री. के. गो. गोखले, बी. ए., एलएल. बी., बेळगांव; पृ. सं. ३४३; किंमत ६ रुपये )

विसाव्या शतकाच्या राजकारणांत सोव्हिएट रशिआला महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें आहे, ह्याबद्दल रशिआच्या शत्रु-मित्रांत सुद्धा एकमत आहे. असें असलें तरी शत्रूची रशिआबद्दलची हाडवैराची भूमिका अगर मित्राची होयबाची भूमिका, ह्या दोन्हींही सत्यान्वेषण करणाऱ्या तिऱ्हाइतांना उपयोगी पडण्यासारख्या नाहींत. त्यांच्या दृष्टीनें रशिआसंबंधीं जितकी खरी माहिती मिळेल तितकी महत्त्वाची आहे. श्री. के. गो. गोखले ह्यांनीं उपरोक्त ग्रंथ लिहून मराठी वाचकांची ही मोठी गरज मोठ्या अंशीं भागविली आहे.

खुद्द ग्रंथकर्त्यांनेंच म्हटल्याप्रमाणें "सोव्हिएट रशिआचा सर्वांगीण सर्वोदय" हा संकलित ग्रंथ आहे. संकलित ग्रंथाला स्वतंत्र ग्रंथांच्या खालचें स्थान मिळणें साहजिक असलें तरी तेवढ्यानें संकलनाचें महत्त्व कमी ठरत नाहीं. श्री. गोखले ह्यांनीं केलेल्या संकलनाची व्याप्ति 'सोव्हिएटमधील वजनें व मापें' इतक्या तपशिलाच्या गोष्टींपासून तहत राजकीय तत्त्वप्रणालीपर्यंत आहे हें लक्षांत घेतलें म्हणजे त्यांनीं केलेल्या परिश्रमाची चांगली कल्पना येईल. पुस्तकांतील सहाव्या प्रकरणांत भारताचीं व रशिआचीं क्रांति-पूर्व साम्यस्थळें दाखविलेलीं आहेत. ह्या प्रकरणाच्या पहिल्याच परिच्छेदांत, गांधीवाद समजण्यास पार्श्वभूमि म्हणूनही समाजसत्तावादी रशिआचें स्थूल आणि सूक्ष्म दृष्ट्या अवलोकन करणें अगत्याचें आहे, असें म्हटलेलें आहे. ग्रंथकर्त्याच्या ह्या विधानाशीं सहमत होणें शास्त्रीय समाजवादाच्या क्रांतिप्रवण कार्यकर्त्यांना कठीण जाईल. 'वाद' ह्या शब्दानें निदान अलीकडे तरी राज्यशास्त्राची एक विशिष्ट दृष्टी असा बोध होऊं लागलेला आहे. अर्थातच, भारताची व रशिआची साम्यस्थळें दाखवतांना वरील विधान केल्यावर, ह्या साम्यांतून भारतांत गांधीवाद कां उद्भवला आणि रशिआंत समाजवाद कां उद्भवला हें सांगणें अपरिहार्य होऊन बसतें. तथापि 'सांप्रदायिक, तांत्रिक आणि तात्त्विक चर्चा, चिकित्सा, घासाघीस ह्या ग्रंथांत नाहीं" असें लेखकानें आपल्या मनोगतांत आधींच सांगितलेलें आहे. पुस्तकाचा हेतू लक्षांत घेतां, महात्माजींना प्रिय असणारा वर्गसमन्वय, आणि मार्क्सवाद अनिवार्य म्हणून मानीत असलेला वर्गकलह, ह्यांची चर्चा टाळणेंच युक्त होतें; आणि तशी ती ग्रंथकर्त्यानें टाळलीही आहे.

तात्त्विक राजकीय चर्चेला अर्थशास्त्राची—उत्क्रांत होत असलेल्या व झालेल्या—पार्श्वभूमि ग्रंथकर्त्यानें दिली असती तर बरें झालें असतें. आधुनिक यंत्रयुग आशिआंत आज ना उद्यां कमी-अधिक वेगानें येणार हें निश्चित आहे. तेव्हां हें यंत्रयुग अवतरतांना भांडवलदारी अर्थव्यवस्था व तिचे अंगभूत दोष पत्करणें अपरिहार्यच आहे किंवा काय, हा प्रश्न आज अत्यंत महत्त्वाचा झाला आहे. मॉरिस डॉब सारखा विख्यात अर्थशास्त्रज्ञ असें म्हणतो कीं आशिआंतील राष्ट्रांचें औद्योगीकरण परंपरागत पद्धतीनें न करतां समाजवादाच्या अधिष्ठानावर नियुक्त पद्धतीनेंच होणें इष्ट आहे. श्री. के. गो. गोखले ह्यांनीं आपल्या पुढील प्रकाशनांत ह्या विषयासंबंधीं निदान एक छोटेसें प्रकरण तरी घालावें अशी सूचना करावीशी वाटते. असो; सोव्हिएट रशिआविषयीं आजकाल जागृत झालेल्या कुतूहलाचें बऱ्याच अंशानें समाधान करणारा संदर्भ-ग्रंथ म्हणून त्याची योग्यता निर्विवाद आहे यांत शंका नाहीं.

म. दा. जो.

## जंगल-उत्पन्न व प्राप्तीवरील कर

### नागपूर हायकोर्टाचा निवाडा

जंगलांत पैदा झालेलें लांकूड व गवत आणि विशिष्ट झाडांचीं पानें, फुलें व फळें यांचेपासून मिळालेलें उत्पन्न हें शेतीचें उत्पन्न समजावयाचें काय? व म्हणून त्यास प्राप्तीवरील करापासून माफी द्यावयाची काय? असा प्रश्न नुकताच नागपूर हायकोर्टापुढें निर्णयार्थ आला होता.

जमिनीपासून मिळणारें कोणतेंहि उत्पन्न शेतीचें उत्पन्न ठरण्यास तें उत्पन्न पैदा करण्यासाठीं माणसाचे परिश्रम कारणीभूत व्हावे लागतात. जमिनीपासून केवळ आपोआप, कोणाच्याहि श्रमाशिवाय पैदा होणारें कोणतेंहि उत्पन्न शेतीचें उत्पन्न होऊं शकत नाहीं. म्हणूनच जंगलांत आपोआप उगवलेलीं झाडें व त्यांचें लांकूड, पानें, फुलें, फळें व गवत यांचेवर त्यांच्या पैदाशीसाठीं जर माणसाचे श्रम कोणत्याहि प्रकारें खर्च झालेले नसतील तर त्यांचेपासून मिळालेलें उत्पन्न हें शेतीचें उत्पन्न ठरत नाहीं व तें प्राप्तीवरील करापासून मुक्त नाहीं, असा नागपूर हायकोर्टानें निर्णय दिला आहे. ( ऑ. इं. रि. १९४८ नागपूर २२८ )

### बँकेच्या उद्घाटनचा "होलिवुड" प्रकार

कॅलिफोर्निया (अमेरिका) येथील एका बँक मॅनेजरनें होलिवुडच्या वातावरणास बळी पडून आपल्या तेथील शाखेच्या उद्घाटन समारंभाची योजना मोठ्या नाविन्यपूर्ण रीतीनें आंखली आहे. आपल्या बँकांच्या उद्घाटन प्रसंगीं पानसुपारी व अत्तरगुलाब देण्यांत येतात आणि खातीं उघडण्यासाठीं आग्रह करण्यांत येतो. चहा-कॉफीचीहि कधींकधीं व्यवस्था असते. अशा प्रसंगीं स्त्रिया सहसा दृष्टीसहि पडत नाहींत. फार तर एखाद्या डायरेक्टराची पत्नी उपस्थित असते! कॅलिफोर्नियांतील वरील उद्घाटन प्रसंगीं बँकेच्या कौंटरच्या खिडक्यांतून दारू दिली जाईल. सुप्रसिद्ध नटी डोरोथी लामूर ही पुढें सरसाऊन, झगा वर करून, आपल्या गुडघ्याजवळून मोज्यांतून नोटा बाहेर काढील व समारंभानें ठेव ठेवून बँकेचें काम सुरू करील, असें प्रसिद्ध झालें आहे! बँकेच्या हॉलमध्यें दिवसभर नृत्य चालू राहील. चित्रपटसृष्टींत शोभणारें हें दृश्य बँकिंगच्या व्यवसायाला कितपत पोषक होईल, हें दिसेलच.

### ओरिएंटल इंटरनॅशनल प्रॉडक्शन्स

हिंदी भांडवलाच्या साह्यानें वरील नांवाखालीं अमेरिकन तज्ज्ञ मुंबई व पुणें येथें चित्रपट काढणार आहेत. एक दानशूर महाराजा पैसा पुरविणार आहे. चित्रपट इंग्रजी भाषेंतच काढले जातील व ते जगभर दाखविण्यांत येतील. वरील ओ. इं. प्रॉडक्शन्सचे अमेरिकन चालक हिंदुस्थानांत दाखल झाले आहेत.

### कांताचा कारखाना काढण्याची संधी

कारवार जिल्ह्यांत कांताचा कारखाना काढण्यासाठीं कांहीं सवलती देण्याचा मुंबई सरकारचा विचार आहे.

कारवारच्या पश्चिम भागांत भटकळ, होनावर, कुमठा व अंकोला टापूंतील जंगलांत असणाऱ्या खैराच्या झाडांपासून कांत तयार करण्यासाठीं कारखाने काढण्याची शक्यता आहे. तेथें रस्ते, नद्या व समुद्र मार्गानीं वहातुकीचीं साधनें असून माल निर्यात करण्यासही बंदराची सोय आहे. तसेंच प्रांताबाहेर पाठविण्यावर सरकार नियंत्रण घालील, अशी शक्यता दिसत नाहीं.

## जलमार्ग व वहातूक

### नवी कालव्यांचा उपयोग

(२)

पंधरा ऑगस्ट १९४७ पूर्वी काय झालें असेल तें होऊन गेलें आहे. यापुढें आपणांस पूर्वीच्याच वळणाचा कित्ता गिरवून चालावयाचें नाहीं. नवें राज्य असल्यानें नवी दिटी आपणास केली पाहिजे व नव्या जोमानें कामास लागलें पाहिजे. आपल्या देशाचें क्षेत्रफळ सुमारें अठरा लक्ष चौरस मैल आहे. यांत ब्रह्मपुत्रा, गंगा, यमुना, महानदी, गोदावरी, कृष्णा, तुंगभद्रा, कावेरी, तापी, नर्मदा, साबरमती, सिंधू, सतलज आदींकरून अनेक मोठमोठ्या नद्या व त्यांचे कालवे आहेत. या सर्वांतून नौकानयन चालू केलें पाहिजे. या नद्यांचे पात्रांतून नौकानयनास लागणारी सपाटी व पाण्याचा पुरवठाही आहे. ही वहातूक बंगाल, बिहार, आसाम, उत्तर हिंदुस्थान व मद्रास या प्रांतांतील सपाटीच्या भागांत तावडतोबीनें चालू होण्याजोगी आहे. ही जलमार्गावरील वहातूक होतां होईल तों देशी होड्यांतूनच करण्याचा प्रयत्न केल्यास फारच हितावह होईल. अनेक माणसें कामास लागतील व रेल्वेवरील सध्या अवजड झालेलें वहातुकीचें ओझें कांहीं भागांत तरी खात्रीनें कमी होईल. ओघानेंच तेवढ्या तेलाची व कोळशाची बचत होईल. कोळसा व तेल हीं आपल्या देशांत विपुल नसल्यानें या दोहोंची जेवढी बचत होईल तेवढें आपलें परावलंबित्व कमी होईल, व त्या प्रमाणांत कोळसा व तेल या वस्तूंचा औद्योगिक उत्पादनास उपयोगी होईल. कांहीं प्रकारचें उत्पादन, उदाहरणार्थ लोखंडाची अगर कांचेची भट्टी घ्या, कोळशाशिवाय अगर तेलाशिवाय होऊंच शकत नाहीं. अशा उत्पादनास या बचत झालेल्या तेलाचा व कोळशाचा उपयोग होईल व त्या प्रमाणांत औद्योगिक उत्पादनांत वाढ होईल. या दोन महत्त्वाच्या व इतर अनुषंगिक कारणासाठी नद्या व कालवे यावरील नौकानयनाकडे कसोशीनें लक्ष पुरविणें आवश्य आहे. हें नौकानयन आपण मुख्यतः मनुष्यांचे सहाय्यानें करण्याचें ठरविल्यास बोटी बांधण्याचा धंदाही साहजिकच वाढेल.

आतांपर्यंतचें विवेचन सबंद देशांतील परिस्थितीबाबत झालें. आतां महाराष्ट्रांत नद्या व कालवे यांतील नौकानयनाची काय परिस्थिति आहे व त्यांत आपणांस कोणत्या सुधारणा केल्या पाहिजेत याचा विचार करूं. महाराष्ट्राचा भूपृष्ठ आपण मनापुढें आणल्यास आपणांस पश्चिमेकडे व उत्तरेकडे मोठमोठाल्या समुद्रसपाटीपासून सुमारें साडेचार ते पांच हजार फूट उंचीच्या पर्वतश्रेणी दिसतात. यापैकीं उत्तरेकडील रांग ही सातपुडा नांवाच्या पर्वताची आहे. ही रांग बहुतेक पूर्वपश्चिम अशी सरळच पसरली आहे. जणू कांहीं महाराष्ट्राचें रक्षण करणारी उत्तरेकडील उभी भिंतच आहे. या पर्वतास फारसे फाटे नाहींत. याच्या पायथ्याशीं दक्षिणचे बाजूस तापी नदी वाहते. पश्चिम बाजूची रांग ही सह्याद्रि पर्वताची आहे. परमेश्वराची महाराष्ट्रास सर्वांत मोठी व बहुमोल अशी ही देणगीच आहे. हा पर्वत पश्चिम बाजूची भिंत आहे. या पर्वताचे पश्चिमेस कोकणपट्टी व त्यालगतच समुद्र आहे. या पर्वताचे पूर्व बाजूस प्रवरा, गोदावरी, भीमा, नीरा, कृष्णा, कोयना आदींकरून नद्यांचे उगम आहेत व आपल्या अडीचशें इंचपर्यंतच्या पावसानें हा पर्वत या नद्यांना वर्षभर पाणी पुरवीत असतो. सह्याद्रीच्या पूर्वेस व सातपुड्याच्या दक्षिणेस महाराष्ट्र पसरला आहे. तापी नदीचें पात्र जास्त उताराचें व खडकाळ असल्यानें त्यांत बोटीची कायमची वहातूक फारशी होण्याजोगी नाहीं. मात्र ठिकठिकाणीं नदीस असलेल्या उताराच्या मानानें बंधारे घातल्यास या नदींतूनही होड्या चालवितां येतील. सह्याद्रीवर उगम पावलेल्या नद्या महाराष्ट्रांत बऱ्याच सपाटीवरून वहात आहेत. अशा सपाटीवरून वहाणाऱ्या नद्या म्हणजे गोदावरी, भीमा, कृष्णा, आदींकरून होत. या तीन नद्यांचे पात्रांतून दरसाल सह्याद्रीवर पडणारे क्रोडो टन पाणी वाहून जात आहे. फक्त भीमा नदीचाच विचार केल्यास या नदींतून सुमारें दोन हजार कोटी टन पाणी वाहून जातें. या वाहून जाणाऱ्या पाण्याचा विचार केला व या नद्यांच्या व उपनद्यांच्या पात्राचा विचार केला म्हणजे या नद्यांतून बोटीची वहातूक न केल्यानें राष्ट्राचें फार नुकसान करीत आहेत. असें वाटतें. भीमा नदीसारख्या संथपणें वाहणाऱ्या नदींतून कायम चालणारी होडीची वहातूक केल्यास महाराष्ट्रांतील अनेक कोळ्यांना काम मिळालें. व पेट्रोलसारख्या परकी आयात मालावर चालणाऱ्या मोटारींची वहातूक तितक्या प्रमाणांत कमी होईल. भीमा नदीच्या सर्वच्या सर्व पात्रांत वर्षभर पाणी नसतें. परंतु या नदीस जर ठिकठिकाणीं लहान लहान बंधारे घालून पाणी अडविलें तर होड्यांच्या वहातुकीइतकें पाणी खात्रीनें मिळेल. या विषयाचा विचार यापेक्षां जास्त येथें करतां येण्याजोगा नाहीं. एकच गोष्ट सर्वसाधारणपणें सांगतां येईल ती ही कीं, ज्या नद्या सपाटीवरून वहात आहेत अशा सर्व नद्यांवर ही योजना करितां येईल. यांत महाराष्ट्रांतील गोदावरी, प्रवरा, मांजरा, भीमा, नीरा, कृष्णा आदींकरून नद्यांचा समावेश होईल.

(अपूर्ण)

## हिंदुस्थानानें १९४८ च्या पहिल्या सहामाहींत केलेली आयात

| महिना | एकूण आयात | कपास—कापड | रेशमी कापड | स्टेशनरी | कागद | टॉयलेटचें सामान | पेट्रोल, इ. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | (रु.) | (रु.) | (रु.) | (रु.) | (रु.) | (रु.) | (रु.) |
| जाने. | ३१,१७,९२,१७७ | ४३,६७,११४ | १,३४,८९० | १५,६६,१४७ | ३५,२८,३९८ | ९,६५,९७५ | २७,२७,४२३ |
| फेब्रु. | ३३,०७,३९,८८५ | ४१,३४,७१६ | ४,७६,३७६ | १६,२१,०५५ | ८२,९५,४११ | ४,१७,६६७ | १८,७८,८६७ |
| मार्च | ३५,०३,२५,५४४ | ५१,२४,८९१ | ११,५९,०४६ | १९,४६,१४१ | ६५,५८,०१९ | ४५,३६६ | ९२,१७,३७२ |
| एप्रिल | २९,७२,२८,१३९ | ४४,८८,५५९ | १,००,८९० | ६,६८,८०४ | ३४,३१,२२८ | ४१,५२० | ९३,९८,८११ |
| मे | ४३,३२,०१,०८८ | ४३,४९,१२० | १९,५५८ | ३,२८,२१७ | ३१,१७,७९९ | ३२,०५८ | १,२०,२९,७६३ |
| जून | ३५,७४,९८,३५२ | २८,५९,३६३ | — | ४,६२,६४७ | ५१,५३,५७१ | ३०,९७६ | ८१,७३,२३७ |

### दि मिरज स्टेट बँक लि., मिरज
( वार्षिक सभा : १२-९-४८ )

रिपोर्टाचे सालीं बाजवीपेक्षा पुष्कळच जास्त रकम परिस्थित्यनुरूप ठेवणें बँकेस जरूर वाटलें; तरी सुद्धा बँकेचा व्यवहार चांगला होऊन नफाहि समाधानकारक झाला आहे. निवळ नफा १,०२,६०७ रु. झाला. बँकेच्या वाढलेल्या ६ लक्ष रु. भांडवलावर ६% डिव्हिडंड देण्यास ह्यावर्षी १९,५०० रु. लागत आहेत. रिझर्व्ह फंडांत २०,७०० रु. मिळविल्यावर तो फंड ४,११,००० रु. होईल. बँकेचे इतर फंड १,१८,५६७ रुपयांचे आहेत. अशा रीतीनें बँकेचें स्वतःचें भांडवल ११ लक्ष, ८ हजार रुपयांवर होत आहे. बँकेचें एकूण खेळतें भांडवल ७७ लक्ष, २२ हजार रु. आहे.

मिरज येथें जाळपोळ, लुटालूट व दंगे होऊन व्यापाऱ्यांचें बरेंच नुकसान झालें आहे. अशा आपद्ग्रस्त व्यापाऱ्यांना सवलतीच्या दरानें (३%) रकमा कर्जाऊ देण्याचें बँकेनें ठरविलें त्याचा फायदा कांहीं व्यापाऱ्यांनीं घेतला आहे. बँकेनें ह्या बाबतींत केलेली मदत प्रशंसनीय आहे. मिरज स्टेट बँकेच्या भक्कमपणांत अहवालाचे सालीं आणखी भर पडली आहे व शिड्यूल्ड बँक होण्यास, भांडवल व रिझर्व्ह फंड ह्यांचे दृष्टीनें, ती पात्र झाली आहे. ( चेअरमन : श्री. वि. पां. बेडेकर, बी. एससी., बी. ई; मॅनेजरः श्री. कृ. धों. शिराळकर, बी. ए. )

### दि लक्ष्मी को. बँक लि., सोलापूर
( वार्षिक सभा : १२-९-४८ )

वरील बँकेचें अहवालाचे वर्षी शेअर भांडवल २,३८० रु. नीं वाढून तें ४०,५८० रु. झालें. सर्व प्रकारच्या ठेवींत वाढ झाली आहे व बँकेचा ताळेबंद ३½ लक्ष रुपयांचा झाला आहे. अ. रजिस्ट्रारकडून कर्जाच्या एकूण रकमा गुंतविण्याच्या मर्यादा वाढवून मिळाल्या नाहींत म्हणून कर्जांत वाढ होऊं शकली नाहीं. एकूण नफा २,९५८ रु. झाला असून ४३/४% डिव्हिडंड देण्यांत येणार आहे. ( चेअरमनः श्री. भ. मा. भालकीकर, वकील; ऑ. मॅ. डायरेक्टर : श्री. स. ना. गोखले, सराफ )

### दि महाड अर्बन को. बँक लि.
( वार्षिक सभा : १२-९-४८ )

वरील बँकेचे सर्व शेअर्स विकले जाऊन शेअर भांडवल ६०,०००रु. झालें आहे. तें आणखी ४०,००० रु. नीं वाढविण्यांत येणार आहे. अहवालाचे वर्षी कर्जे, ठेवी, एकूण व्यवहार, ह्या सर्व बाबतींत बँकेनें चांगली प्रगति केली आहे. बँकेचें खेळतें भांडवल ९३/४ लक्ष रुपये झालें आहे. त्यापैकीं कर्जामध्यें १½ लक्ष रुपये असून ५ लक्ष, ६० हजार रुपये इन्व्हेस्टमेंट खातीं आहेत. ह्यावरून पैशाचा तरतेपणा स्पष्ट होईल. बँकेचा कारभार अत्यंत काटकसरीचा असल्याचें नफा-तोटा पत्रकावरून दिसून येतें. बँकेस निवळ नफा ११,७१३ रु. झाला आहे. ५% डिव्हिडंडला २,९२५ रु. लागतील. म. गांधी स्मारक फंडास २०१ रु. देणगी देण्यांत येईल. ( चेअरमनः श्री द. न. वैद्य, वकील, बी. ए., एलएल. बी., ऑ. मॅ. डायरेक्टरः श्री. पि. गो. मेहता, वकील, बी. ए., एलएल. बी.)

**धरणांच्या व वीजउत्पादनाच्या सरकारी योजना**—धरणांच्या व विद्युच्छक्तीच्या सरकारी योजना पुऱ्या झाल्या, म्हणजे पाण्याखालील शेतजमिनींत २ कोटी, ७० लक्ष एकरांची भर पडेल आणि विजेचें उत्पादन ९० लक्ष किलोवॅट्सनीं वाढेल. सध्यां ४ कोटी, ८० लक्ष एकर जमिनीस पाणीपुरवठा आहे आणि विजेचें उत्पादन फक्त ५ लक्ष किलोवॅट आहे.





**मुंबई सावकारी कायदा**

| | | |
|---|---|---|
| सविस्तर, कलमवार, चिकित्सक विवरण | किं. २॥ | रु. |
| कूळ कायदा, आवृत्ति ३ री | किं. ३ | रु. |
| नवीन भाडें नियंत्रण कायदा | किं. २ | रु. |
| द्विभार्या प्रतिबंधक कायदा | किं. १ | रु. |
| हिंदू घटस्फोट कायदा | किं. १ | रु. |
| शेतकरी कर्जनिवारण कायदा — कापडी | किं. ४॥ | रु. |
| शेतकरी कर्जनिवारण कायदा — कागदी | किं. ४ | रु. |

हीं सर्व पुस्तकें आजतागायतच्या दुरुस्त्यांसह असून त्यांत अद्ययावत् न्यायालयीन निर्णय, चिकित्सक व सविस्तर टीपा व मूळ इंग्रजी टेक्स्ट आहेत. हीं पुस्तकें पुण्याच्या व्यवसायी वकिलांनीं तयार केलीं आहेत.

पत्ता—लॉ ॲकॅडेमी, ७२० सदाशिव, पुणें २.

**नवीन पुष्कळ निघाले, तरी**
**तुळजाराम मोदी,**
**सातारा**
**ह्यांचें पुढारीपण कायम आहे.**






## आर्थिक दुखण्यावरील तज्ज्ञ वैद्यांचे तोडगे

हिंदुस्थानांतील आर्थिक दुरवस्थेवर उपाय सुचविण्यासाठी हिंद सरकारनें कांहीं प्रमुख अर्थशास्त्रज्ञांना दिल्लीला बोलाविलें होतें. ह्या अर्थशास्त्रज्ञांनीं केलेल्या शिफारसीमधील महत्त्वाचे मुद्दे पुढील प्रमाणें होते, असें समजतें. (१) शेतीच्या पांचशें रुपयांच्यावरील उत्पन्नावर कर बसविणें. (२) वारसा-कर बसविणें. (३) धंद्यांवरील नफ्याचा कर शेकडा १६३/४ टक्केपर्यंत वाढविणें. (४) कंपन्यांच्या नफ्याच्या वाटणीवर नियंत्रण घालणें. नव्या कंपन्यांनीं ६ टक्क्यांपेक्षा अधिक नफा देऊं नये आणि जुन्या कंपन्यांनीं युद्धोत्तर दोन वर्षांच्या सरासरी नफ्यापेक्षा अधिक नफा वाटूं नये. (५) नफ्याची वांटणी झाल्यानंतर उरलेली रक्कम व्यवहारांत येऊं न देणें. (६) दरवर्षी ५ हजार रुपयांच्यावर उत्पन्न असलेल्या व्यक्तींना सक्तीनें शिल्लक टाकावयास लावणें. (७) हे उपाय अंमलांत आणण्यासाठी एक पुरवणी अंदाजपत्रक ताबडतोब तयार करणें (८) चलनवृद्धीच्या विस्ताराला आळा घालणें. चलनी नोटा अधिकांत अधिक किती काढावयाच्या हें ठरवून असा आळा घालतां येईल. (९) अन्नधान्य, साखर, तेल, कापड अशासारख्या जरूरीच्या वस्तूंवर नियंत्रणें घालणें.

कलकत्ता येथें एक आर्थिक परिषद् चलनवृद्धीवर इलाज सुचविण्यासाठी भरली होती. कलकत्ता विद्यापीठाच्या आर्थिक शाखेचे प्रमुख, प्रा. विनय कुमार सरकार परिषदेच्या अध्यक्षस्थानीं होते. ह्या परिषदेनें सुचविलेले उपाय सूत्ररूपानें पुढील प्रमाणें आहेत.

(१) सध्याचें किंमतींचें मान लक्षांत घेऊन निरनिराळ्या व्यावसायिकांसाठी व उत्पन्नांच्या निरनिराळ्या गटांसाठी रोख किती पैशाची जरूर आहे तें ठरविण्यांत यावें. ह्यासाठी अधिकांत अधिक गरजा लक्षांत घेण्यांत याव्या. (२) साठा केलेल्या नोटा उजेडांत आणाव्या आणि कांहीं विवक्षित मर्यादेपलीकडे त्या व्यवहारांतून काढून घ्याव्या. ह्यासाठी सरकारनें सर्व चलनी नोटा मागवून घ्याव्या आणि त्यांच्यापैकी जितक्या परत व्यवहारांत आणावयाच्या असतील तितक्या नव्या नोटा देण्यांत याव्या. व्यवहारांतून निघालेल्या नोटांवर व्याज देण्यांत यावें; पण तें कांहीं कालानंतर देण्यांत यावें. (३) पतीच्या व्यवहाराच्या मर्यादा संकुचित कराव्या असें रिझर्व्ह बँकेला वाटल्यास व्यापारी बँकांच्या रिझर्व्ह रेशोंत फरक करण्याचे अधिकार तिला द्यावे. (४) अन्नधान्य आणि कापडासारख्या वस्तूंचें वांटप व नियंत्रण करावें. (५) वाहतुकींतील अडथळे आणि वाहतुकीच्या कारभारांतील लांचलुचपत ताबडतोब बंद करण्यांत यावी आणि योग्य त्या बाबतींत आयातीवरील बंधनें शिथिल करण्यांत यावींत. (६) कॅनडा, ऑस्ट्रेलिआ, इत्यादि देशां प्रमाणें हिंदुस्थानांतील ब्रिटिश भांडवल आपल्या पौंडी शिलकेंतून विकत घ्यावें.

ऑल इंडिआ मॅन्युफॅक्चरर्स ऑर्गनायझेशन ह्या संस्थेतर्फे हिंदी अर्थमंत्र्यांना एक खलिता पाठविण्यांत आला होता. त्यांत चलनवृद्धीवर पुढीलप्रमाणें उपायें सुचविले आहेत. (१) उत्पादनवाढीसाठी सरकारनें कामगारांना जास्त उत्पादनाबद्दल बोनस द्यावें, नफ्यांत वाटा देऊं नये. जे कारखाने इतरांच्या मानानें अधिक प्रगति दाखवितील त्यांना सवलती द्याव्या. आयाती संबंधींचें धोरण अधिक सढळ करावें. (२) खरेदी करण्याची शक्ति निर्बंधित करण्याच्या कामीं सरकारला व जनतेला बरेंच कार्य करता येईल. जरूरीपेक्षां अधिक असलेली ही शक्ति नष्ट न करतां तिचा उत्पादनासाठी उपयोग करण्यांत यावा. (३) प्रथम किंमती स्थिर करण्यांत याव्या आणि नंतर वेतन व पगारापैकीं कांहीं भाग भविष्यकालीं देण्यासाठीं मागें राखून ठेवण्यांत यावा. नोटांचा सांठा उजेडांत आणण्यासाठी बेअरर बॉंडस् काढण्यांत यावेत. उत्पादनांत घट होण्याचीं कांहीं कारणें म्हणून ह्या संस्थेनें राष्ट्रीयीकरण, कामगारांना नफ्यांत वाटणी देण्याच्या योजना, इत्यादि कारणें नमूद केलीं आहेत.

---

## मुंबई प्रांतांतील कापडाचें वांटप

ता. १ नोव्हेंबरपासून मुंबई प्रांतांत कापडाचें वांटप सुरू होणार आहे. रेशन-कार्डावर कापड देण्याऐवजी प्रत्येक व्यक्तीला वेगळीं कूपन्स देण्यांत येणार आहेत. निरनिराळ्या तऱ्हांचीं कोणतीं कापडें कूपन्सवर कोणत्या प्रमाणांत घेतां येतील तेंही 'पॉइंटस' पद्धतीनें ठरविण्यांत येणार आहे. नवीन वांटप-पद्धतींत, कापड ग्राहकापर्यंत पोंचेपर्यंत जे मध्यस्थ असतात त्यांची संख्या शक्य तितकी कमी करण्यांत आली आहे. सहकारी संस्थांना वांटप करण्याच्या कामीं उत्तेजन देण्यांत आलें आहे. कापड उत्पन्न होणाऱ्या प्रत्येक केंद्रांत एक मुख्य वांटप करणारी संस्था ठेवण्यांत येणार आहे. प्रत्येक जिल्ह्यांतहि एकच प्रमुख घाऊक वांटपाची संस्था ठेवण्यांत येईल. किरकोळ वांटप करणाऱ्या दुकानांची संख्याहि कमी करण्यांत येणार आहे. टॅरिफ बोर्डाच्या शिफारसींना अनुसरून मध्यवर्ती सरकार गिरणीमधील कापडाच्या योग्य त्या किंमती ठरवील. गिरण्यांतून उत्पन्न होणाऱ्या सर्व कापडावर किंमती छापण्यांत येतील. गिरणींतील किंमतीपेक्षा २० टक्क्यांपेक्षा केव्हांही अधिक नाहीं अशा बेतानें प्रांतिक सरकारांना किरकोळ विक्रीच्या किंमती ठरवितां येतील. सध्यां व्यापाऱ्यांच्या जवळ असलेलें कापड ३१ ऑक्टोबरपर्यंत त्यांना खुल्या बाजारांत विकतां येईल. त्यानंतर मात्र किंमत न छापलेल्या कापडाची विक्री करतां येणार नाहीं. मध्यवर्ती सरकार गिरण्यांतील कापडाच्या उत्पादनावर नियंत्रण ठेवील आणि त्यांची वांटणी प्रांत व संस्थानें ह्यांच्यांत करील. प्रांतिक सरकारांना वाटल्यास त्यांच्या वांट्याला आलेलें सर्व कापड अगर कांहीं कापड सरकारी दुकानांतून वांटतां येईल. मुंबई सरकारनें शहरांतील प्रत्येक व्यक्तीमागें दरवर्षी २४ वार व खेडेगांवांत दरडोई दरवर्षी १८ वार कापडाची मागणी मध्यवर्ती सरकारकडे केली आहे.

---

## कपाशीची नियंत्रित किंमत

हिंदुस्थान सरकारनें कपाशीची किंमत नियंत्रित केली आहे. २५।३२ इंची जरिला कपाशीची आतां कमाल व किमान किंमत दर ७८४ पौंडांच्या खंडीस अनुक्रमें ६२० रु. व ४९५ रु. राहील. इतर जातींच्या कपाशीची किंमतहि नियंत्रित केली आहे. किमान किंमतीच्या खालीं किंमत जाऊं लागली, तर सरकार किमान दरानें कपास विकत घेईल. कमाल दराचे वर किंमत जाऊं लागली, तरी सरकार ती कपास स्वतः घेईल. अशा रीतीनें शेतकरी व गिऱ्हाईक ह्या दोघांचेंहि हित पहाण्यांत येईल.

---

**सीलोनमध्यें रिझर्व्ह बँक**—सीलोनमध्ये रिझर्व्ह बँक स्थापन करण्याचा तेथील सरकारचा विचार चालू आहे.

**अमेरिकेची चित्रपटांची निर्गत**—अमेरिकेनें १९४८ च्या पहिल्या सहामाहींत १८,४५,७०,६२७ फूट कच्ची सिनेमा फिल्म व १५,२७,७४,६७६ फूट तयार सिनेमा फिल्म निर्गत केली. फिल्म घेण्यासाठी लागणारे ८,७०८ कॅमेरे ह्याच सहामाहींत अमेरिकेनें निर्गत केले.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व
रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.